महाराष्ट्र शासन

जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा (ग्रामपंचायत निर्वाचन विभाग)

| | |
|---|---|
| E-Mail : dydeobuldhana@gmail.com | दुरध्वनी क्रमांक : ०७२६२-२४२४११/२४३११६ |
| क्रमांक कावि/अ.का./ग्रा.प.नि./कक्ष-१५/ 823 /२०२५ | दिनांक : - 31 / १० / २०२५ |

तात्काळ अत्यंत महत्वाचे

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बुलढाणा

२) उपविभागीय अधिकारी बुलढाणा, सिंदखेड राजा, मेहकर, खामगांव, मलकापुर ,जळगांव जामोद

३) तहसिलदार बुलढाणा / चिखली / देऊळगांव राजा / सिंदखेड राजा / मेहकर / लोणार /खामगांव शेगांव/ जळगांव जामोद / संग्रामपुर / मलकापुर / नांदुरा / मोताळा.

४) गट विकास अधिकारी बुलढाणा / चिखली /देऊळगांव राजा / सिंदखेड राजा / मेहकर / लोणार / खामगांव / शेगांव/ जळगांव जामोद / संग्रामपुर / मलकापुर / नांदुरा / मोताळा.

**विषय** :- जिल्हा परिषद व त्याअंतर्गत पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकासाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्दी बाबत.

**संदर्भ** :-

१) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५ /प्र.क्र.२०/ का.७ दिनांक २३ सप्टेंबर **२०२५**

२) राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५ /प्र.क्र.२०/ का.७ दिनांक २७ ऑक्टोबर **२०२५**

--***--

राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक कावि -रानिआ/जिपपंस/२०२५/प्र.क्र.२०/का-७ दिनांक २३/०९/२०२५ अन्वये जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करावयाचा कार्यक्रम प्राप्त झाला असुन त्यानुसार दिनांक ०८/१०/२०२५ रोजी निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. निवडणूक विभाग व निर्वाचक गण निहाय प्रारुप मतदार यादीवर दिनांक ०८/१०/२०२५ ते १४/१०/२०२५ या कालावधीमध्ये हरकती व सुचना मागविण्यात आल्या असुन त्यानुसार अंतिम मतदार यादी संदर्भाकिंत पत्र क्रमांक २ मधील निर्देशानुसार दिनांक ०३/११/२०२५ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

आपणास सुचित करण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येणारी अंतीम मतदार यादी दिनांक ०३/११/२०२५ रोजी पदनिर्देशीत ठिकाणी प्रसिध्द करण्यात येणार आहे. त्याबाबतची प्रसिध्दी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यलय, पंचायत समिती कार्यालय, तहसिल कार्यालय तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सुचना फलकावर,स्थानिक वृत्तपत्र स्थानिक केबल टिव्ही, जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयाचे संकेत स्थळ ई. ठिकाणी प्रसिध्द करावयाचे आहे. त्याबाबतची प्रसिध्दी सर्व स्तरावर करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(डॉ.किरण पाटील)
**जिल्हाधिकारी बुलढाणा**

**प्रतिलिपी :-**

१) जिल्हा नाझर जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांना माहिती तथा उचित कार्यवारीसाठी रवाना.

२) जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी बुलढाणा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना. जिल्हा परिषद व पंचायत समिती गण व गट निहाय प्रारुप मतदार यादी दिनांक ०३/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार असुन त्याबाबत प्रसिध्दी जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बुलढाणा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना. जिल्हा परिषद व पंचायत समिती गण व गट निहाय प्रारुप मतदार यादी दिनांक ०३/११/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार असुन त्याबाबत प्रसिध्दी जिल्हयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत..

४) जिल्हा माहिती अधिकारी बुलढाणा यांना सुचित करण्यात येते की, मतदार यादी प्रसिध्दीच्या बाबतची सुचना सर्व स्थानिक वृत्तपत्रामध्ये करण्यात यावी.

**जिल्हाधिकारी बुलढाणा**